## परिपत्रक क्र. १/२०२०

क्र. १/२०२० दि. ५.३.२०२०

**विषय:** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालय व शैक्षणिक विभागांना परिषदा / कार्यशाळा / चर्चासत्र / परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन आर्थिक सहाय्य

संदर्भ: (१) विद्यापीठ परिपत्रक क्र. १४२/२००४,दि.५.११.२००४
(२) विद्यापीठ अधिसुचना क्र. ११७/२०१६ दि. ८.१२.२०१६

(१) सर्व संबंधिताच्या माहितीकरिता कळविण्यात येते की, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालय व शैक्षणिक विभागांना परिषदा / कार्यशाळा / चर्चासत्र / परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन आर्थिक सहाय्य देण्याबाबत विहीत प्रपत्राचा नमुना व इतर बाबीसंदर्भात परिपत्रक क्र.१४२ दि. ५.११.२००४ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यामध्ये महत्वेकरुन नमुद असलेली बाब खालीलप्रमाणे आहे.

"विद्यापीठाच्या साधारण निधीमधून परिषदा/ चर्चासत्र / परिसंवाद आयोजनाकरिता अर्थसहाय्याची मागणी करण्याकरिता महाविद्यालय तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांनी अर्ज सादर करण्याच्या दोन तारखा निश्चित करुन, त्या ३१ ऑगष्ट व ३१ डिसेंबर राहील. "

(२) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागामध्ये व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्य/विभागीय स्तरावरील परिषदा/ कार्यशाळा/चर्चासत्र/परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन अनुक्रमे रु.५०,०००/-, ३०,०००/-, २०,०००/-, १०,०००/- चे आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात येत असते. याबाबत अधिसुचना क्र. ११७/२०१६, दि.८.१२.२०१६ अन्वये विद्यापीठ राजपत्र भाग-२ मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.

(३) उपरोक्त परिच्छेद क्र. १ व २ मध्ये नमुद दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) उपलब्ध आहे.

(४) संलग्नित महाविद्यालय तसेच शैक्षणिक विभागांनी विद्यापीठ साधारण निधी मधुन अर्थसहाय्याची मागणी करीत असतांना विहीत तरतुदी अंतर्गत विहीत प्रपत्रामध्ये व उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे निश्चित केलेल्या तारखापुर्वी विद्यापीठाकडे आवश्यक त्या सहपत्रासह अर्ज सादर करण्यात यावे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ